**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर- ४१६००४**

क्र.कोविमं/शाखा-१०वी परीक्षा/ 2822
दिनांक - २१/०२/२०२२

**प्रति,**

**सर्व केंद्रसंचालक / उपकेंद्रसंचालक,**
**माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी ) मार्च-एप्रिल २०२२**

**विषय : माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी ) मार्च-एप्रिल २०२२ साठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यादीबाबत...**

**संदर्भ :- वाचा** - या कार्यालयाचे जा.क्र.क्रकोविमं/शाखा माध्य./२६३७ दि.०९/०२/२०२२ चे पत्र

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार आपल्या केंद्रावरील/ उपकेंद्रावरील परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची विषय निहाय, माध्यमनिहाय, दिनांकनिहाय बैठक क्रमांकाची यादी दि.१८/०२/२०२२ रोजी वितरण केंद्रामार्फत हस्तपोच देण्यात आली आहे. त्यानुसार केंद्रावरील बैठक व्यवस्थेनुसार प्रत्येक ब्लॉकमध्ये प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यास विषयनिहाय, माध्यमनिहाय लागणाऱ्या एकूण प्रश्नपत्रिकांची संख्या काढण्यासाठी तसेच एखाद्या विद्यार्थ्याने घेतलेले विषय, उत्तराची भाषा तसेच विषयातील त्रुटीबाबत शंका असल्यास ती दुर करुन घेण्यासाठी उपयोग होईल. त्यामुळे सांख्यकीय माहितीशी तुलना करुन, कमी पडणाऱ्या प्रश्नपत्रिकांची मागणी परीक्षेपूर्वी मंडळाकडे करता येईल. तसेच प्रत्येक दिवशी होणाऱ्या विषयाच्या पेपरसाठी ब्लॉकनिहाय बैठक व्यवस्था करण्यासाठी उपयोग होईल. या यादीमध्ये दरम्यानच्या कालावधी मध्ये विषय बदल/सूट व माध्यम बदलामुळे फेरफार झाल्यास तशी नोंद घ्यावी. त्याप्रमाणे आपल्या केंद्रावर पुरेशा प्रश्नपत्रिका उपलब्ध असतील याची खात्री करावी.

तसेच केंद्रावर प्रत्येक दिवशी होणाऱ्या विषयाच्या पेपरसाठी विषयनिहाय/ब्लॉकनिहाय लागणाऱ्या प्रश्नपत्रिकांची माहिती आपल्या केंद्रावर / उपकेंद्रावर तयार करुन ठेवावी म्हणजे आपणांस परीक्षेच्यावेळी पर्यवेक्षक यांना वेळेत ब्लॉकप्रमाणे प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन देणे सोईचे होईल.

**काही विद्यार्थ्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे विलंबाने भरलेले असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक आपणास प्राप्त विद्यार्थी यादीमध्ये नाहीत परंतु अशा विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रिका मिळालेली आहे त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना** परीक्षेस बसण्यास **परवानगी द्यावी.** सदर केंद्रावर त्यांनी घेतलेल्या विषयांच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध असल्याची खात्री करावी, अशा विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिका इतर उत्तरपत्रिकांच्या सोबत परिरक्षकाकडे पाठवाव्यात. ज्या विद्यार्थ्यांना इमरजेन्सी बारकोड (Emergency Barcode) देण्यात आला, त्याचप्रमाणे एखाद्या विद्यार्थ्याने पुर्वीच्या परीक्षेतील एखाद्या विषयात मिळालेली सूट(प्रवेशपत्रात त्या विषयाची परीक्षा द्यावयाची असे नमूद केले असल्यास) ऐनवेळी मिळावी **म्हणून मागणी केल्यास त्या विद्यार्थ्याकडून तसे हमीपत्र घेवून मंडळाला वेळीच सादर** करावे. तसेच इतर **कोणत्याही उत्तीर्ण झालेल्या विषयास सूट असतानाही तो विषय घेवून बसण्याची इच्छा ऐनवेळी** प्रदर्शीत केल्यास त्यास त्या **विषयास हमीपत्र घेवून बसू द्यावे. हमीपत्राचे मसुदे केंद्रसंचालक सूचना पुस्तिकेत** आहेत.

विद्यार्थ्याचे बैठक क्रमांक बेंचवर लिहिण्यासाठी खडूचा उपयोग करावा. तसेच बैठक क्रमांक परीक्षा संपेपर्यंत सुस्पष्ट राहतील असे पहावे. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेवर त्याचा स्वत:चा बैठक क्रमांक घालावा अशी सुचना वेळीच विद्यार्थ्यांना द्यावी.

**विशेष गरजा असणा-या (दिव्यांग) विद्यार्थ्यांच्या सवलतीबाबत (सर्वसाधारण सूचना क्र.९ च्या अनुषंगाने)**

ज्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेमार्फत सवलतीसाठी कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविले आहेत त्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे सवलती देण्यात आल्या आहेत. तथापि ज्यांनी प्रस्ताव दिलेले नाहीत किंवा ऐनवेळी अपघाती दिव्यांगत्व प्राप्त झाले आहे असे विद्यार्थी दिव्यांगाची सवलत देण्याबाबत आग्रह धरतात अशा प्रकरणी त्यांची वैंद्यकिय प्रमाणपत्र तपासून शालेय शिक्षण विभाग यांचे **शासन निर्णय क्र.संकिर्ण/२०१७/(११८/१७)/एस.डी.-६ दि. १६ ऑक्टोबर २०१८** मधील तरतूदीनुसार दिव्यांगाची खात्री करून त्यांच्या मागणीनुसार योग्य सवलत देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यांच्या दिव्यांग प्रमाणापत्रासह कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. **लेखनिक देताना तो इयत्ता ९ वी मध्ये शिकत असणाराच असावा याची कटाक्षाने काळजी घ्यावी.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे त्याचा सांकेतांक २०१८१०१६१८०६४६८३२१ असा आहे. **दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्व विषयांच्या उत्तरपत्रिका परिरक्षकांकडे स्वतंत्ररित्या जमा करण्यात याव्यात.**

आपल्या केंद्रावर प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांकनिहाय प्रवेशपत्रिकांची एक प्रत पाठविण्यात येत आहे. त्यामुळे प्रवेशपत्रिकेची प्रत पुन्हा संबंधित शाळेकडून घेण्याची आवश्यकता नाही. मात्र फोटोबाबत किंवा काही कारणांने मंडळ कार्यालयाकडून व मुख्याध्यापकांच्या सहीनिशी प्रवेशपत्रिकेवर दुरुस्त्या करण्यात आल्या असतील तर अशाच दुरुस्त्या ग्राह्य धरण्यात याव्यात. दुरुस्त केलेल्या प्रवेशपत्रिकेची सत्यप्रत शाळेकडून करुन घेण्यात यावी. तशा सूचना संबंधित शाळांना देण्यात आल्या आहेत.

तरी उपरोक्तप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी व यासंदर्भात काही अडचणी असल्यास त्वरीत परिरक्षक तसेच मंडळ कार्यालयाशी दुरध्वनीवरुन संपर्क साधावा.

**(सत्यवान सोनवणे)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत :**
**१) मा.शिक्षण उपसंचालक कोल्हापूर विभाग ,कोल्हापूर**
**२) शिक्षणाधिकारी (माध्य)सातारा/सांगली/कोल्हापूर**
**३) सर्व परिरक्षक, सातारा/ सांगली / कोल्हापूर**